**-: प्रेस नोट :-** **दिनांक १८/११/२०२३**

**लो.टी.मार्ग पोलीस ठाणे मुंबई येथील सोने बनविण्याच्या कारखान्यामध्ये जबरदस्तीने घुसून चाकू व पिस्तूल चा धाक दाखवून जबरी चोरी करणाऱ्या दोन आरोपीतांना जेरबंद केले बाबत**

दिनांक ०९/११/२०२३ रोजी सायंकाळी १८.३० वाजताच्या सुमारास फिर्यादी यांच्या खंडेलवाल सदन, काळबादेवी रोड, मुंबई ०२ येथील सोन्याचे दागिने बनविण्याच्या कारखान्यात राजेश बौध्दु राय असे नाव सांगणारा व त्याचेसोबत असलेल्या एका अज्ञात आरोपीताने प्रवेश करून फिर्यादी व त्यांच्या कारागीरांना पिस्तुल व चाकुचा धाक दाखवुन फिर्यादी यांना मारहाण करून अं.कि ७ लाख ५० हजार रू किमतीचे १३० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने जबरीने चोरी करून नेले म्हणून फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी वरुन लो.टी.मार्ग पोलीस ठाणे येथे गु.र.नं.६५८/२०२३ कलम ३९४,४५२,३४ भारतीय दंड संहिता सह ३,२५ भारतीय हत्यार कायदा सह कलम ३७ (१)(अ),१३५ महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे घटनास्थळी तात्काळ पोहचुन पाहणी केली असता सदर गुन्हा हा लो.टी.मार्ग पोलीस ठाणे अभिलेखावरील आरोपी राजेश बौध्दु राय याने इतरांसह मिळून केला असल्याचे दिसुन आले. यास्तव नमुद आरोपीताचा शोध घेण्याकरीता सपोनि वंजारी व पथक यानी अंत्यत कुशलतेने तसेच तांत्रिक दृष्टया सखोल तपास करुन नमुद आरोपी हा दिल्ली येथे असल्याचे निष्पन्न झाल्याने सपोनि सुशिलकुमार वंजारी व पथक यांनी दिल्ली येथे जावुन अहोरात्र पाळत ठेवून आरोपी नामे राजेश बौध्दू राय वय ३४ वर्षे, रा.ठी. गाव बलहा, ठाणा राजनगर, जिल्हा मधुबनी, राज्य बिहार यास दिनांक १३/११/२०२३ रोजी गुन्हा घडल्यापासुन ७२ तासाच्या आत अटक केले.

अटक आरोपी राजेश बौध्दु राय याचेकडे पोलीस कोठडीदरम्यान केलेल्या तपासामध्ये त्याच्या साथीदाराबाबत मिळालेल्या माहीतीच्या आधारे नमुद गुन्हयातील दुसरा आरोपी वंसत राजु दावअण्णा पेल्ली उर्फ चिट्टु हा विरार येथे असल्याची खात्रीलायक माहीतीनुसार विरार परिसरात कुशलतेने दुसरा आरोपी वंसत राजु दावअण्णा पेल्ली उर्फ चिट्टु वय ४३ वर्षे, धंदा-नाही, रा.ठी.अे.डी.मेन्शन बिल्डींगच्या खाली, रुम नं. ०६, धोबी तलाव, चर्नी वाडी, टोकरी गल्ली, आझाद मैदान, मुंबई, दुसरा पत्ता:- बरफपाडा, गणपती मंदीराच्या मागील झोपडपट्टी, विरार, पालघर यास दिनांक १७/११/२०२३ रोजी अटक करण्यात आले आहे.

आरोपी क्र. ०२ वंसत राजु दावअण्णा पेल्ली उर्फ चिट्टु वय ४३ वर्षे, यास आज दिनांक २५/११/२०२३ रोजी पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आलेली असून त्यांच्याकडून गुन्हयातील जबरीने चोरी केलेली मालमत्ता व गुन्हयामध्ये वापरलेले अग्निशस्त्र व चाकु हस्तगत करीत आहोत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी ही डॉ. अभिनव देशमुख, मा. अप्पर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रादेशिक विभाग) मुंबई, डॉ. मोहित गर्ग, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, मुंबई, श्रीमती ज्योत्स्ना रासम, सहायक पोलीस आयुक्त, पायधुनी विभाग, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.ज्ञानेश्वर वाघ यांच्या अधिपत्याखालील स.पो.नि. सुशिलकुमार वंजारी, पोउपनि. चिंतामणी जाधव व गुन्हे प्रकटीकरण पथकांचे पो. अंमलदार शरदचंद्र साटम, किरण गुजर, प्रसाद शिंदे, अनिल सांळुके, सुमित खांडेकर, गिरिश गाडेकर यांनी पार पाडली. आरोपी वंसत राजु दावअण्णा पेल्ली यास विरार येथून अटक करण्यासाठी गुन्हे शाखा, विरार युनिट याची मदत झाली आहे.